संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# दूरसंचारचा संचार वाढावा

**ऑल्विन** टॉफलर या लेखकाने आपल्या फ्युचर शॉप या पुस्तकात भविष्यातील जगाचे स्वरुप कसे असेल याचे चित्र रंगवण्याचा प्रयत्न केला. त्यात व्यक्ती किंवा समाजाच्या दैनंदिन जीवनावर तंत्रज्ञानाचा प्रचंड प्रभाव असेल. एवढेच नव्हे तर तंत्रज्ञानामुळे मनुष्याचे अनेक व्यवहार मर्यादित होतील. त्यातही दूरसंचार किंवा संदेश वहनाचे जाळे इतके विस्तारले जाईल की मनुष्याला आपली कामे घरबसल्या करता येतील त्यातून वेळ, पैसा आणि शक्तीची बचत होऊन प्रगती किंवा विकास वेगाने होऊ शकेल. असाही विश्वास त्याने व्यक्त केला होता. जी आज वस्तुस्थिती दिसते आहे संपूर्ण जग वेगवेगळ्या संवाद आणि प्रसार माध्यमांमुळे जवळ आले आहे. पंचवीस वर्षापूर्वी जगाची दूरसंचार व्यवस्था आणि आजची डिजिटल क्रांती या सगळ्या गोष्टींचा आढावा घेतला तर तंत्रज्ञानाच्या प्रगतीचीविलक्षण झेप पाहायला मिळते आज 'जागतिक दूरसंचार दिन' आहे. तीस वर्षापूर्वी दूरसंचार म्हटल्यानंतर केवळ टेलिफोन किंवा इलेक्ट्रॉनिक मीडिया यासारख्या क्षेत्राचा विचार केला जात होता. आज दूरसंचार या शब्दाची व्याप्तीच एवढी वाढली आहे की त्यामध्ये तंत्रज्ञानाच्या माध्यमातून केले जाणारे सर्व व्यवहार समाविष्ट होऊ शकतात. आजच्या ई-गव्हर्नन्सपासून ते ई-बँकिंगपर्यंत हा सगळा प्रकार विस्तारलेल्या दूरसंचार जाळ्याचाच परिणाम म्हणावा लागतो. कारण पूर्वी केवळ संवादासाठी वापरला जाणारा दूरसंचार शब्द आता थेट अनेक व्यवहारांमधल्या तंत्रज्ञानासाठी उपयोगात आणला जातो. म्हणजेच विविध क्षेत्रांमध्ये संचार करणाऱ्या तंत्रज्ञानाची व्याप्ती यानिमित्ताने लक्षात घेणे क्रमप्राप्त ठरते. इतका प्रचंड बदल किंबहुना ज्याला क्रांती हा शब्द योग्य ठरू शकेल अशी घडून आलेली आहे. भारत हा विकसनशील देश असूनही या क्षेत्रामध्ये त्याने घेतलेली झेप निश्चितच वैशिष्ट्यपूर्ण ठरते. तरीदेखील एकूण भारताची लोकसंख्या ग्रामीण भागाचे प्रमाण आणि त्या तुलनेमध्ये लोकांकडून उपयोगात आणली जाणारी सर्व प्रकारची इलेक्ट्रॉनिक माध्यमे यामध्ये सुधारणा घडून येण्यासाठी बराच मोठा वाव असल्याचे स्पष्ट होते. जगामध्ये ज्या देशांना महासत्ता म्हटले जाते त्या ठिकाणी दूरसंचार किंवा दूरसंदेश वहन या तंत्रज्ञानाचा शंभर टक्के प्रभाव पाहायला मिळतो. लोकांना त्या प्रभावामुळेच महासत्ता बनणे शक्य झाले आहे.

### ई-गव्हर्नन्स, ई-बँकिंग

एकेकाळी ठिकठिकाणी असलेले टेलिफोन किंवा दूरदर्शनचे मोठमोठे टॉपर्स हे दूरसंचारचे निदर्शक मानले जात होते. वायर किंवा केबलच्या माध्यमातून गावेच्या गावे किंवा शहरे एकमेकांना जोडण्याची भली मोठी प्रक्रिया दूरसंचाराची प्रगती दाखवणारे ठरत होते. परंतु अक्षरशः केवळ दहावर्षामध्ये हे चित्र पालटले. भारताने कालावधीत अनेक उपग्रह अवकाशामध्ये सोडून दूरसंचार क्षेत्रात अमूलाग्र क्रांती घडवली. हवामानाचा अंदाज आधुनिक रडार यंत्रणा बिनाकेबल किंवा बिनावायर संपर्क यंत्रणा म्हणजेच विनाॲंटिना दूरचित्रवाणीचे प्रसारण एवढेच नव्हे तर आता प्रत्येकाच्या हातात असलेल्या मोबाईलवर संवादापासून ते विविध प्रकारच्या चित्रपटांपर्यंत अनेक गोष्टी एकाच ठिकाणी उपलब्ध होतात. ईमेल करण्यासाठी आता कॉम्प्युटरची आवश्यकता राहात नाही. मोबाईलवरून तुम्ही ईमेल पाठवू शकता. कोणतेही व्यवहार मोबाईलच्या माध्यमातून म्हणजेच परिणामी इंटरनेटच्या साहाय्याने घडवून आणण्याची क्रिया साध्य झालेली आहे. स्वाभाविकपणे या तंत्रज्ञानाचा वापर शासकीय व्यवहारांमध्ये खाजगी कंपन्यांच्या दैनंदिन व्यवस्थापनामध्ये होऊ लागला. एकेकाळी पूर्णपणे मनुष्यशक्तीवर चालणारी बँकिंग व्यवस्था आता केवळ पंचवीस टक्के मनुष्य बळावर चालते आणि पंच्याहत्तर टक्के तंत्रज्ञानाच्या माध्यमातून कार्यरत राहाते. पैसे काढण्यासाठी टाकण्यासाठी बँकेत जाण्याची आवश्यकता भासत नाही. पेटीएम मधून व्यवहार करता येतात. कोणतीही बिले किंवा देणी देण्याकरीता त्या त्या विभागाच्या कार्यालयात जाण्याची गरज उरलेली नाही. ई-बँकिंग किंवा मोबाईल बँकिंगवरून हे सगळे व्यवहार तुम्हाला करता येतात. काही क्षणामध्ये हे सगळे व्यवहार पूर्ण होतात. झालेल्या व्यवहारांचा सगळा तपशील काटेकोरपणे तुमच्या हातामध्ये उपलब्ध होतो. केवळ देशांतर्गतच नव्हे तर जगाच्या कुठल्याही देशाशी या विस्तारलेल्या दूरसंचार जाळ्याचा उपयोग करून आपले काम करता येऊ शकते. स्वाभाविकपणे एकूणच समाजजीवनाच्या सर्व अंगांना व्यापणारा हा दूरसंचार आता दैनंदिन जीवनाची गरज ठरली आहे.

### शक्ती आणि पैशाची बचत

इतक्या वेगाने या क्षेत्राचा विस्तार झाला असल्याने भारतासारख्या विकसनशील देशापुढे त्याचा शंभर टक्के वापर करण्याचे आव्हानही उभे आहे. खरे तर ज्या तंत्रज्ञानामुळे देशाच्या सर्व क्षेत्राच्या प्रगतीला नवा आयाम मिळालेला आहे. किंवा अर्थ व्यवस्थेपासून ते देशाच्या सुरक्षिततेकरीता ज्याचा मोठा आधार प्राप्त झालेला आहे. अशा दूरसंचारची इतक्या वेगाने व्याप्ती वाढवता येईल तितकी वाढवली गेली पाहिजे. आजचा तरूण वर्ग हा डिजीटलायझेशनच्या युगातलाच नागरिक म्हणावा लागेल. त्याच्या शिक्षणामध्ये दूरसंचारचा झालेला उपयोग आणि अनेक व्यवहार करताना त्याला इंटरनेटचा वापर करण्याची झालेली सवय फार महत्त्वाची ठरते. आणि म्हणून हे दूरसंचार क्षेत्र देशाच्या अतिदुर्गम भागापर्यंत पोहचण्याची आवश्यकता आहे. भारताने आतापर्यंत केलेली प्रगती कौतुकास्पद आहेच. परंतु अजूनही आदिवासी किंवा दुर्गम भागामध्ये मोबाईल नेटवर्क उपलब्ध न होण्यापासून ते ग्रामपंचायतीमध्ये संगणकाचा वापर न होण्यापर्यंतच्या अनेक गोष्टींचा समावेश होऊ शकतो. या उणिवा किंवा त्रूटी तातडीने भरून काढल्या गेल्या तर भारताचा महासत्ता होण्याकडचा प्रवास वेगवान होईल. सध्या निवडणुकांचा हंगाम सुरू आहे. प्रचार काळात प्रचारामध्ये वापरली गेलेली दूरसंचाराची माध्यमे अचंबित करणारी ठरतात. फेसबुक, व्हॉटसअप, इन्स्टाग्राम अशा सर्व माध्यमातून निवडणुकीने वेगळाच आयाम गाठल्याचे दिसून आले. या सर्व पार्श्वभूमीवर जागतिक दूरसंचार दिनाचा विचार करताना दूरसंचारचा अधिक दूरपर्यंत संचार होणे आणि त्यावर भारतासारख्या देशाने लक्ष केंद्रित करणे महत्त्वाचे ठरते. यासाठी लागणारी बुद्धिमत्ता किंवा कौशल्य सदैवाने आपल्याकडे उपलब्ध आहे. त्याचा अधिक सकारात्मक विधायक उपयोग करता येऊ शकतो.